**मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्रैमासिक / सहामाही बैठका घेणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : बैठक २०१७/प्र.क्र.१००/१६-ब (सी)**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०३ मार्च, २०१८

<u>संदर्भ</u> : १. सा.प्र.वि.शासन परिपत्रक क्रमांक:-बीसीसी २०११/प्र.क्र.४५५/११/१६-ब, दि.०३.०५.२०११
२. सा.प्र.वि.शासन पत्र क्रमांक:- बीसीसी २०११/प्र.क्र.४५५/११/१६-ब, दि.२८.०२.२०१३
३. सा.प्र.वि.शासन पत्र क्रमांक:- बीसीसी २०१५/प्र.क्र.१३३/११/१६-ब, दि.२३.०२.२०१६
४. सा.प्र.वि.शासन परिपत्रक क्रमांक:-संघटना १५१६/प्र.क्र.२७३/१६-ब, दि.०२.०१.२०१७

**<u>प्रस्तावना :-</u>**

मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांमार्फत अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या अडी-अडचणी / प्रश्नांबाबत वेळोवेळी संबंधितांकडे पाठपुरावा केला जातो. त्याकरिता साधारणपणे दर सहा किंवा तीन महिन्यातून एकदा मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत बैठका आयोजित करुन त्यांच्या मागण्यांच्या विचार करावा, अशा सूचना वेळोवेळी शासन निर्णय / परिपत्रकांद्वारे / शासन पत्रांद्वारे दिलेल्या आहेत. मात्र, तरीदेखील शासकीय कार्यालयांमार्फत नियमितपणे ठोस कार्यवाही होत नसल्याची बाब संबंधित मागासवर्गीय संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणली आहे. विविध मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी संघटनांच्या मागणीनुसार सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त दि.०३.०५.२०११ मधील शासन परिपत्रकानुसार दिलेल्या आदेशांचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी व मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत व मागण्यांबाबत दर सहा महिन्यांनी किंवा तीन महिन्यातून एकदा बैठक घेण्याबाबत खालीलप्रमाणे पुन्हा निर्देश देण्यात येत आहेत.

**परिपत्रक :-**

मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवाशर्ती, सेवाभरती, पदोन्नत्या, बदल्या, गोपनीय अहवाल यासारख्या संवेदनशील बाबींवर अभ्यासपूर्वक व गांभीर्याने निर्णय घेण्याच्या दृष्टीने अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या मान्यताप्राप्त मागासवर्गीय संघटनांच्या प्रतिनिधींशी वेळोवेळी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने, प्रशासकीय विभाग प्रमुखांनी दर सहा महिन्यातून किमान एकदा, कार्यालय प्रमुख/विभाग प्रमुख यांनी तीन महिन्यातून किमान एकदा किंवा आवश्यकता असेल तर त्यावेळी संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. तसेच, यापुढे मागासवर्गीय अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत चर्चा करुन, त्यांचे प्रश्न स्थानिक पातळीवरच निकाली निघतील असे पहावे.

वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना सादर करावा. या सर्व कार्यवाहीचा आढावा वर्षातून एकदा प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांचेमार्फत घेतला जाईल.

सदर शासन परिपत्रक, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०३०३११२८१२७२०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sumit Mullick

Digitally signed by Sumit Mullick
DN: c=IN, o=All India Services, ou=Office Of The Chief Secretary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4132c0fcf1579033c9191db931387ee95669a1ae16f5e2993685f19a0dc58108, serialNumber=a470036d78cb1fc69a4bac1c2f92aa202af735a969fca984bce4bc03d1657264, cn=Sumit Mullick
Date: 2018.03.06 12:48:05 +05'30'

**( सुमित मल्लिक )**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
५. मुख्य सचिवांचे उप सचिव
६. सर्व विभागीय आयुक्त
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
९. प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई
१०.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
११.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
१३.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
१४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका
१६.संचालक, समाजकल्याण, पुणे
१७.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१८.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१९.संचालक, सेवायोजन, मुंबई
२०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व परीक्षा), मुंबई/नागपूर
२२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२४.सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग व कार्यालय प्रमुख
२५.सर्व मंत्रालयीन विभाग
२६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२७.निवडनस्ती.